# महाराष्ट्र शासन
## अपर तहसिलदार व कार्यकारी दंडाधिकारी, मिरा-भाईंदर यांचे कार्यालय

**पत्रव्यवहाराचा पत्ता :- प.पु.डॉ.केशव बळीराम हेगडेवार भवन इमारत, पहिला माळा, मॅक्सस मॉलच्या मागे, अमृतवाणी रोड, भाईंदर (प)- ४०१ १०१. तालुका-ठाणे, जिल्हा- ठाणे.**

**दुरध्वाी क्र. ०२२-२८१८५९१६** **ईमेल आयडी-**tahmirabhayander@gmail.com


क्र.महसुल/ कांदळवन/कावि-१९३/२०२० दिनांक :२७/०१/२०२०

प्रति,
मा.उप वरनसंरक्षक,
कांदळवन कक्ष, मुंबई

77

विषय : मिरा भाईंदर महापालिका हद्दीतील मिरारोड पश्चिम येथे नाझरेथ आगर परिसरात सरकारी व खाजगी जागेत कांदळवन पाणथळ चा -हास करुन CRZ चे उल्लंघन

संदर्भ : कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समिती यांचेकडे अर्जदार श्री.धीरज परब यांनी दाखल केलेली तक्रार अ.क्र.७७

कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समिती यांचेकडे श्री.धीरज परब यांनी दाखल केलेली तक्रार या कार्यालयास ई-मेलव्दारे प्राप्त झालेली आहे. (तक्रार अ.क्र.७७ )

उपरोक्त संदर्भिय विषयाचे अनुषंगाने मा.अध्यक्ष, कोकण पाणथळ तक्रार निवारण समितीने वनविभाग, पोलीस निरीक्षक, उप अधिक्षक, भूमी अभिलेख, मिरा भाईंदर महानगरपालिका व तक्रारदार यांचेसोबत स्थळपहाणी करुन त्याबाबचा अहवाल देण्याबाबत निर्देश दिले होते. त्याअनुषंगाने दि.०३/०१/२०२० रोजी स्थळपाहणी निश्चित करणेत आली.

त्यानुसार स्थळपाहणी दरम्यान या कार्यालयाकडील नायब तहसिलदार, पोलीस अधिकारी-कर्मचारी, मिरा भाईंदर महानगरपालिकेचे अधिकारी-कर्मचारी, मंडळ अधिकारी भाईंदर व संबधित तलाठी यांनी अर्जदार यांचे समवेत विषयांकित जागेची दि.०३/०१/२०२० रोजी स्थळपहाणी केली असुन मंडळ अधिकारी भाईंदर यांनी त्यांचेकडील पत्र जा.बा.नि.क्र.१२८/२०१९-२० दि.०३/०१/२०२० अन्वये खालील प्रमाणे एकत्रित स्थळपहाणी अहवाल या कार्यालयास सादर केला आहे.

स्थळपाहणी दरम्यान मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील मिरा रोड (पश्चिम) येथे नाझरेथ आगर परिसरात सरकारी व खाजगी जागेत कांदळवन पाणथळचा -हास करुन CRZ चे उल्लंघन केलेबाबत अर्जदार यांनी तक्रार यापूर्वी दिलेली होती. अर्जदार श्री.धिरज परब यांनी सदर ठिकाणी यापूर्वी पाहणी केली होती त्याप्रमाणे अहवाल दिल्यास हरकत नाही असे सांगितले. सदर ठिकाणी मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी ३ ते ४ वर्षापूर्वी माती व डेब्रीज भराव करुन रस्त्या लगत झाडाची लागवड केलेली आहे. सदर ठिकाणी ५० वर्षा पासुन पत्र्याचे घर बांधलेले आहेत. याठिकाणी नवीन बांधकामे झालेली नसुन आज रोजी कांदळवनचे नुकसान झालेले दिसुन येत नाही. तसेच सदर जमीन CRZ बाधित आहे अगर कसे याबाबत वन विभागाचे अभिप्राय आवश्यक ठरत आहेत. तसेच सदर तक्रारीबाबत तहसिलदार ठाणे यांनी त्यांचेकडील पत्र क्र.महसूल/क-१/टे-२/जमीनबाब/कावि-१४/२०१८ दि.१०/१०/२०१८ अन्वये Geo Tagging सह फोटो व मंडळ अधिकारी भाईंदर यांचा मूळ अहवाल सादर केला आहे.

तरी प्रकरणी कोकण पाणथळ तक्रार निवारण समिती यांचे निर्देशानुसार वरीलप्रमाणे वस्तुस्थितीदर्शक अहवाल सादर करीत आहोत. सोबत उपस्थित असलेल्या सदस्यांची यादी, मंडळ अधिकारी भाईंदर यांचेकडील मूळ अहवाल सादर केलेला आहे.

**(डॉ. नंदकिशोर देशमुख)**
**अपर तहसीलदार मिरा-भाईंदर**


उप वनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई
आवक क्रमांक 284 4/3/2020
मुख्य लेखापाल उप वनसंरक्षक


प्रत : मा.जिल्हाधिकारी ठाणे (महसूल शाखा) यांजकडे माहितीस्तव सविनय सादर

दूरध्वनी: २८१९२८२८ / २८१९३०२८ / २८१८११८३ / २८१८१३५३ / २८१४५९८५
फॅक्स: २८१९७६३६

# मिरा - भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय भाईंदर

# MIRA BHAINDAR MUNICIPAL CORPORATION

स्व.इंदिरागांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प), ता.जि.ठाणे-४०११०१.

जा.नं. मनपा/अति/२६६/२०१८-१९ दिनांक : ३१/०५/२०१८

प्रति,
मा.सदस्य सचिव
कोकण पाणथळ तक्रार निवारण समिती तथा
उपवनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई.

**विषय :- मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील मिरा रोड (प.) येथे नाझरेथ आगार परिसरात सरकारी व खाजगी जागेत कांदळवन / पाणथळचा ऱ्हास करुन सिआरझेडचे उल्लंघन**

**संदर्भ :- श्री. धिरज परब यांची तक्रार. (मुद्दा क्र.१६)**

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणास कळविणेत येते की, शासन महसुल व वन विभागाकडील शासन निर्णय क्र.एस/३०/२०१३/प्र.क्र.४७९/भाग-१/फ-३, दि.०२/०९/२०१६ च्या शासन निर्णया नुसार मा. विभागीय आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली कांदळवन तक्रार निवारण समिती स्थापना करण्यात आलेली आहे. सदर समितीच्या होणाऱ्या मासिक बैठकीमध्ये तालुका स्तरीय स्थापन समितीच्या सदस्यांसमवेत स्थळपाहणी करुन मा.न्यायालयाच्या दिलेल्या निर्देशाच्या अनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही करणेबाबत दि.१९/१२/२०१७ रोजी स्थळ पहाणी करुन कारवाई करण्याकरीता कांदळवन सनियंत्रण समिती यांनी आयोजन केले होते.

त्यानुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेतील प्रभाग समिती क्र.०२ अंतर्गत येणाऱ्या अवर लेडी ऑफ नाझरेत चर्च मागील लालबहादूर शास्त्री नगर व नेहरु नगर लगत कांदळवन /पाणथळ/ सी.आर.झेड बांधित सॉल्ट डिपार्टमेंटच्या मालकी जागेवर परिसरात झोपडया उभारुन अतिक्रमण केल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर लगेच महसूल विभाग, महानगरपालिका व पोलिस विभाग यांच्या मार्फत त्या ठिकाणी कारवाई करुन एकुण १४७ उभारलेल्या झोपडया जे.सी.बी.सह व मनुष्यबळाचा उपयोग करुन काढून टाकण्यात आल्या व सदरची कांदळवन/पाणथळ/सी.आर.झेड बांधित जागा मोकळी करण्यात आली सोबत फोटोग्राफ जोडले आहे.

सदरची जागा शासकीय असल्याने त्या ठिकाणी असलेली घरे रहिवास व्याप्त असुन ती कधीपासुनची आहेत तसेच त्या ठिकाणी झालेला माती भराव केव्हा पासुन आहे. याबाबत मिठ अधिक्षक - साल्ट विभाग, तलाठी, महसुल विभाग व मनपा यांचे समवेत सर्व्हेक्षण करण्याची कार्यवाही प्रस्तावीत आहे.

सदरच्या ठिकाणी खाडीचे येणारे पाणी बंद केलेले होते. बंद केलेले पाणी नालेसफाईच्या वेळी पुर्ववत करण्यात आलेले आहे.

दूरध्वनीः २८१९२८२८ / २८१९३०२८ / २८१८११८३ / २८१८१३५३ / २८१४५९८५
फॅक्सः २८१९७६३६

# मिरा - भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय भाईंदर

# MIRA BHAINDAR MUNICIPAL CORPORATION

स्व.इंदिरागांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प), ता.जि.ठाणे-४०११०१.

जा.नं. ____________________ दिनांक :____________

सदर ठिकाणी नव्याने झालेल्या सिमेंट पत्र्याच्या सहाय्याने केलेले एक कच्चे बांधकाम दि. १५/०५/२०१८ रोजी तोडण्यात आलेले आहे.

सदरच्या जागेबाबत मिठ अधिक्षक श्री. अग्रवाल यांचे सोबत संपर्क साधला असता सदर बाबत सॉल्ट विभाग व विकासक यांच्या मध्ये जमिनीच्या मालकी हक्काबाबत न्यायालयात दावा दाखल असल्याबाबत सांगितले त्यानुसार मिठ अधिक्षक - साल्ट विभाग, तलाठी, महसुल विभाग व मनपा यांचे समवेत सर्व्हेक्षण करुन पुढील कार्यवाही प्रस्तावीत आहे.

राधा स्वामी सत्संग येथे केलेला माती भराव काढून टाकणे व खाडीचे येणारे पाणी बंद केलेले आहे ते पुर्ववत चालु करणे व ऱ्हास झालेल्या कांदळवनाची लागवड करण्यात यावी याबाबत राधा स्वामी सत्संग यांना जा.क्र.मनपा/अवि/८८/२०१८/१९ दि.२६/०४/२०१८ अन्वये कळविण्यात आलेले आहे. त्याअनुषंगाने त्यांनी स्वतःहून नाल्या शेजारी असलेला माती भराव काढून टाकलेला आहे.

(दिपक पुजारी)
उप-आयुक्त (अतिक्रमण)
मिरा भाईंदर महानगरपालिका

| | | |
|---|---|---|
| | | जोडली आहे.<br>➢ सबब सदरची तक्रार निकाली काढणेस विनंती आहे. |
| ३ | **तक्रार क्र. ७७**<br>**श्री. धिरज परब**<br>**दि. ११.०६.२०१८**<br>मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दितील मिरारोड पश्चिम येथे नाझरेथ आगार परिसरात सरकारी व खाजगी जागेत कांदळवन पाणथळ चा ऱ्हास करुन CRZ चे उल्लंघन | ➢ अपर तहसीलदार, मिरा भाईंदर यांनी त्यांचेकडील दि. १०/०६/२०२१ रोजीच्या पत्रान्वये अहवाल सादर केलेला आहे.<br>➢ सदर तक्रारीचे अनुषंगाने स्थळपाहणी करण्यात आली असून स्थळपाहणीदरम्यान कांदळवनाचा ऱ्हास झालेबाबत निदर्शनास आल्याने तलाठी साझा नवघर यांचेमार्फत महाराष्ट्र पर्यावरण संरक्षण कायदा १९८६ चे कलम १५ व १९ अन्वये संबंधितांवर गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत. सोबत अपर तहसीलदार, मिरा भाईंदर यांचेकडील अहवालाची सोबत जोडली आहे.<br>➢ सबब सदरची तक्रार निकाली काढणेस विनंती आहे. |
| ४ | **तक्रार क्र. १०४**<br>**श्री. धिरज परब**<br>**दि. १९/११/२०१९**<br>भाईंदर पश्चिम येथे एसटी डेपोच्या आरक्षणातील कांदळवन नष्ट करुन झाडे तोडणे तसेच बेकायदा डेब्रीजचा भराव व थर्माकोल आदीचा कचरा टाकून पर्यावरणाचा ऱ्हास केल्याप्रकरणी | ➢ सदर तक्रारीचे अनुषंगाने अपर तहसीलदार, मिरा भाईंदर यांनी दि. ०१/०३/२०२३ रोजी अहवाल सादर केलेला आहे.<br>➢ सदर तक्रारीचे अनुषंगाने स्थळपाहणी करणेत आली असून स्थळपाहणी दरम्यान कांदळवनांचा ऱ्हास झाल्याचे निदर्शनास आलेले आहे.<br>➢ तक्रारीतील नमूद क्षेत्र हे भारतीय वन अधिनियम १९२७ चे कलम ४ अन्वये राखीव वने म्हणून घोषित करण्यात आलेले असल्याने तसेच सदरचे क्षेत्र हे कांदळवन कक्षास हस्तांतरीत करणेत आलेले असल्याने प्रकरणी पुढील कार्यवाही ही कांदळवन कक्षाकडून होणे अपेक्षित असल्याने सदरची तक्रार ही कांदळवन कक्ष विभागाकडे वर्ग करुन सदर तक्रारीचे अनुषंगाने कांदळवन कक्ष यांचेकडून अहवाल घेणेत यावा.<br>➢ सोबत अपर तहसीलदार, मिरा भाईंदर यांच्या अहवालाची प्रत जोडली आहे. |
| ५ | **तक्रार क्र. १५०**<br>**श्री. स्टॅलिन डी**<br>**दि. ०९.०४.२०२१**<br>Apparent Land grab, illegal construction and destruction of Mangroves, Coastal wetlands and CRZ १ areas at Dive Regiion, illegal construction of cement mixing plant at Dive. | ➢ सदर तक्रारीचे अनुषंगाने तहसीलदार, भिवंडी यांनी अहवाल सादर केलेला आहे.<br>➢ तक्रारीतील नमुद ठिकाणाची स्थळपाहणी करणेत आली असून स्थळपाहणी दरम्यान सदरचे क्षेत्र हे राखीव वने म्हणून घोषित झाल्याचे दिसून आले.<br>➢ प्रकरणी कांदळवनाचा ऱ्हास झाला असल्याने वनपरिक्षेत्र अधिकारी ठाणे यांचेमार्फत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.<br>➢ सोबत तहसीलदार, भिवंडी यांचेकडील अहवालाची प्रत जोडली आहे.<br>➢ सबब सदरची तक्रार निकाली काढणेस विनंती आहे. |
| ६ | **तक्रार क्र. १७०**<br>**श्री. अमजद खान**<br>**दि. २१.०२.२०२२.**<br>मौजे पेणकरपाडा ता. जि. ठाणे जुना स.नं.२०६ नविन स.नं.३८/२ या जागेवर कांदळवनापासून ५० | ➢ सदर तक्रारीचे अनुषंगाने स्थळपाहणी करणेत आली असून स्थळपाहणी दरम्यान कांदळवनाचा ऱ्हास झाल्याचे दिसून आले आहे.<br>➢ प्रकरणी पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६ चे कलम १५ व १९ अन्वये गुन्हा दाखल करणेबाबत अपर तहसिलदार, |